सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:- डीआरए-०५२१/सी.आर.१९/२०२१/जाहिरात दिनांक:- ११ ऑगस्ट, २०२२

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-जाहिरात क्रमांक १०/२०२० विमा उपसंचालक, सामान्य राज्य सेवा, गट-अ, कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करण्याबाबत**

**संदर्भ:- शुध्दीपत्रक क्र. डीआरए-०५२१/सी.आर.१९/२०२१/जाहिरात, दिनांक ०६ डिसेंबर, २०२१**

विमा उपसंचालक, सामान्य राज्य सेवा गट-अ संवर्गातील **एका** पदाकरीता दिनांक ५ ऑगस्ट, २०२० रोजी आयोगातर्फे जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीमधील शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या अनुषंगाने दिनांक ०६ डिसेंबर, २०२१ रोजीच्या शुध्दीपत्रकाव्दारे उपरोक्त पदाकरीता अर्ज करू इच्छिणा-या उमेदवारांना नव्याने अर्ज करण्यास संधी देण्यात आली होती. तसेच, यापुर्वी अर्ज केलेल्या उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही, असे नमूद करण्यात आले होते. यापुर्वी अर्ज केलेल्या उमेदवारांना व शुध्दीपत्रकानुसार नव्याने अर्ज करणा-या उमेदवारांना शुध्दीपत्रकातील परि.क्र. ३.१ मध्ये नमूद केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या.

तथापि, प्रस्तुत पदाकरीता अर्ज केलेल्या बऱ्याच उमेदवारांनी कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर केली नाहीत. यास्तव प्रस्तुत पदासाठी अर्ज केलेल्या **सर्व उमेदवारांना** कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करण्याची एक संधी देण्यात येत असुन त्यांनी दिनांक ०६ डिसेंबर, २०२१ रोजीच्या शुध्दीपत्रकातील परि. ३.१ मध्ये नमूद केल्यानुसार कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

उमेदवारांनी संदर्भाधीन शुध्दीपत्रकातील तरतुदी विचारात घेवून कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील. तसेच कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर न केल्यास अशा उमेदवारांचा प्रस्तुत निवडप्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

उपरोक्त विषयांकित पदासाठी केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने (लागू असलेली) कागदपत्रे/प्रमाणपत्रे PDF करून विहित आकारमानामध्ये आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' अंतर्गत Certificates Upload' या मेनूमध्ये दिनांक १८ ऑगस्ट,२०२२ रोजी २३:५९ वाजेपर्यंत अपलोड करणे अनिवार्य राहील.

ठिकाण:- मुंबई

उप सचिव, (सरळसेवा छाननी)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई